SMART पुण्य नगरी
पुणे, पिंपरी-चिंचवड
शनिवार, ३१ ऑगस्ट २०१९

# सिटी इंटरनॅशनल स्कूलकडून पूरग्रस्तांना मदत

पुणे : कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी सिटी इंटरनॅशनल ग्रुप ऑफ स्कूलने मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. ग्रुपच्या सातारा, वानवडी, औंध येथील शाळांतील विद्यार्थ्यांनी जीवनावश्यक वस्तू जमा केल्या आहेत. तिन्ही शाळांच्यां प्राचार्यांनी विद्यार्थी, शिक्षकांना मार्गदर्शन केले. प्रत्येक शाळेतून सुमारे ६० हून अधिक पेट्या पूरग्रस्त केंद्रांना पाठविण्यात आल्या आहेत. याबाबत स्कूलचे विश्वस्त व संचालक मौलिक शाह म्हणाले, पूरग्रस्तांना केलेल्या या छोट्या मदतीतून मुलांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होईल.